बीड । शुक्रवार

११.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : १०१

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955









# मुख्याधिकाऱ्यांच्या घरात कोट्यावधी रुपयांचे घबाड



मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण

- १२ लाख रुपयांची लाच घेताना छत्रपती संभाजीनगर येथील एसीबी पथकाने केली कारवाई
- पाच कोटी रुपयांची कॅश ; सोने, चांदी सापडल्याची चर्चा !
- सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सकाळचे सहा वाजणार
- माजलगाव मध्ये खळबळ ; गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरूच !



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपालिके वादग्रस्त मुख्यअधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना माजलगाव येथे राहत्या घरी तब्बल १२ लाख रुपयांची लाच स्वीकारताना छत्रपती संभाजीनगर येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. एसीपीच्या कारवाईने माजलगाव येथे एकच खळबळ उडाली आहे. माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या अत्यंत जवळचे म्हणून चंद्रकांत चव्हाण यांची ओळख होती. माजलगाव नगरपालिकेचे भ्रष्ट अधिकारी व वादग्रस्त अधिकारी म्हणून त्यांची माजलगाव मध्ये नेहमीच चर्चा होती. विशेष म्हणजे बारा लाख रुपये घेताना मुख्याधिकारी चव्हाण यांना एसीपी ने रंगेहत पकडले, त्यांच्या घरी तपासणी



कारवाई करत असलेल्या अधिकारी...

केली असता तब्बल पाच कोटी रुपयांची कॅश सोने चांदी असे मोठे घबाड एसीपीच्या हाती लागले असल्याची चर्चा माजलगाव मध्ये होत आहे. प्रसार माध्यमांना माहिती देण्यासाठी सकाळ होणार असल्याची माहिती पुढे आली असून रात्रभर चंद्रकांत चव्हाण यांच्या संपत्तीची मोजमाप होणार आहे. बीड जिल्ह्यात एसीबीने एवढ्या मोठ्या प्रमाणात केलेली पहिलीच कारवाई म्हणावी लागेल.

काहीच दिवसापूर्वी बीड येथील ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे यांना व त्यांच्या लिपिकाला ८० हजार रुपयाची लाच घेताना एसीबीने पकडले होते. बीड जिल्ह्यात महसूल व पोलीस विभागात मागील वर्षी अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना एसीबीने लाच घेताना पकडले होते. यावर्षीही विविध विभागातील अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना एसीबी पथकाने रंगेहात पकडले आहे. नगर परिषद विभागात सर्वत्र आर्थिक लूट सुरू आहे. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यावर बीड जिल्ह्यात एसीबीची ही पहिलीच कारवाई म्हणावी लागेल. माजलगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याला सुमारे १२ लाखाची लाच घेताना छत्रपती संभाजीनगरच्या एसीबीने पकडल्याची माहिती आहे. या संदर्भात अद्यापही एसीबीची कारवाई सुरू असून छत्रपती

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● बीड नगरपालिकेचा नंबर कधी

बीड जिल्ह्यात सर्वात भ्रष्ट व सामान्यांची लूट तसेच गुत्तेदार पोचणारी नगरपालिका म्हणजे बीड नगरपालिकेकडे पहिले जात आहे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांपासून अधिकाऱ्यापर्यंत सर्वच पैसे शिवाय काम करत नसल्याचे चित्र आहे. कोट्यावधी रुपयांची भ्रष्टाचार बीड नगरपालिकेत झाला असून जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आलेली आहेत. माजलगाव येथील मुख्याधिकारी यांच्यावर एसीबी कारवाई झाली आहे मात्र जिल्ह्यात भ्रष्टाचाराच्या डोहात बुडालेल्या बीड नगरपालिकेच्या अधिकाऱ्या विरोधात एसीबी कारवाई कधी होणार याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# विद्यादीप बालसुधारगृह छळ प्रकरण ४ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल, तिघांना अटक

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप बालगृहात अल्पवयीन मुलींच्या छळ प्रकरणी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली आहे. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कारवाईचे आदेश देताच पोलीस प्रशासन कामाला लागले आहे. पोलिसांनी याप्रकरणी ४ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. तर तिघांना



अटक करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील विद्यादीप बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलींचा छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालगृहात मुलींना अमानवी व अघोरी वागणूक दिली जात होती. या प्रकरणी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे यांना निलंबित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत ही घोषणा केली. तसेच विद्यादीपची मान्यता रद्द करण्याचेही घोषणा फडणवीस यांनी केली. याप्रकरणी बालगृहातील ४ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी सिस्टर सुचिता गायकवाड, केअर टेकर अलका साळुंके व सहायक अधीक्षक वेलरी जोसेफना अटक झाली आहे.

काय आहे प्रकरण? छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप

▶▶ उर्वरित पान २ वर

# जुगार अड्ड्यावर पेठ बीड पोलिसांचा छापा

## दोन लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त ; ११ जुगारी जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे रशिद ऊर्फ मोग्या आब्दुल रज्जाक रा. गांधीनगर शेख शेरु रा.इस्लामपुरा पेठ बीड हे काही इसमांना सोबत घेवुन अलकबीर फंक्शन च्या पाठीमाघे बंद लाकडी मशीन येथे मोकळ्या जागेत बल्बच्या उजेडात काही लोकांना घेवुन तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही स्वतः पोलीस निरीक्षक, अशोक



मुदिराज, सोबत सपोनि. प्रितम कुमार पुजारी, सफौ/१३६महादेव पवार, पोह/१८०३ नितीन राठोड, पोह/१६१३ रमेश भोले, पोह/१०६५ नितीश माने, पोशि/२१४६ शिवाजी राख, पोशि/२०५३ दिपक भोजे,

▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाई अवैद्यरीत्या दारू विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या वर पोलिसांची कारवाई

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड पोलीस अधीक्षकाचा कार्यकाल सांभाळल्या पासून माननीय नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील अवैद्यरीत्या धंदे करणाऱ्यावर पोलिसांची जरब बसली आहे. असे दिसून येते याच अनुषंगाने

आज अंबाजोगाई दिनांक ९ जुलै रोजीअंबाजोगाई येथील शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलिसांनी अंबाजोगाई शहरातील नगरपरिषद समोरील वाईन शॉप मधून श्रीकृष्ण



लहूदास साखरे वय ४० वर्ष राहणार चिंचपूर तालुका धारूर व अन्य एक इसम अवैद्यरित्या दारू विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचारी यांना मिळताच त्यांनी केलेल्या कारवाईत देशी व विदेशी दारू सोबत दोन मोटरसायकल अंदाजे किंमत ९२ हजार ६५० किमतीचा मुद्देमाल त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आला पुढील कारवाई सुरू होती.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बीड नवनीत कावत, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, डीवायएसपी अनिल चोरमले, तुमच्या मार्गदर्शनाखाली ,अंबाजोगाई शहर

▶▶ उर्वरित पान २ वर

# रिल्ससाठीचा स्टंट अंगलट आला, चारचाकी गाडीसह युवक ३०० फूट दरीत कोसळला; व्हिडिओ व्हायरल

**सातारा । प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या पर्वतरांगात वसलेला निसर्गाने नटलेला जिल्हा म्हणजे सातारा महाबळेश्वर असेल किंवा प्रतापगड किल्ला असेल निसर्ग सौंदर्याचं वरदान लाभलेला हा प्रदेश. त्यामुळेच, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सातारा जिल्ह्यात पर्यटनासाठी पर्यटक येतात. येथील निसर्ग सौंदर्य आणि विविध स्थळांना भेटी देतात. प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या अनेक स्थळांपैकीच एक असलेलं सडावाघापूर. येथील उलटा धबधबा पर्यटकांच्या आकर्षणाचं ठिकाण. मात्र, येथे



आल्यानंतर काही तरुणांकडून होणारी हुल्लडबाजी, फोटो आणि रिल्ससाठी व्हिडिओ काढताना केले जाणारे स्टंट पाहता पोलिसांनी इथं सध्या विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. कारण, आपल्या चारचाकी कारसह स्टंट करताना एक युवक तब्बल ३०० फूट दरीत कोसळल्याची घटना समोर आली आहे. सडावाघापूर पठारावरील निसर्ग सौंदर्या बरोबर उलटा

▶▶ उर्वरित पान २ वर

# नागरिकांना सर्व सुविधा गतिमानतेने देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## परळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर ; शेतकरी, विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी , सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तत्पर व गतिमान पद्धतीने देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. सर्व नागरिक यांनी दर सोमवारी व गुरुवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत होणाऱ्या जनता दरबारमध्ये आपल्या समस्या रास्तपणे प्रशासनाकडे मांडव्यात, त्यांचे निराकरण तात्काळ करण्यात येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना दिला.

परळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टोकवाडी येथे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत महसूल विभागाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बालविवाह रोखणे व व्यसनमुक्तीबाबत शपथही नागरिकांना त्यांनी दिली. यावेळी परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार वेंकटेश मुंडे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, परवीन पठाण, राजाभाऊ ढगे, सरपंच गोदावरी राजाराम मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू उर्फ बालाजी मुंडे, श्याम आघाव, डॉक्टर नामदेवा आघाव, डॉक्टर सतीश घुगे, पोलीस



निरीक्षक मझर सय्यद, मंडळ अधिकारी अरबी कुमटकर, मंगल मुंडे, नीता कोल्हेवाड, गणेश फड, विस्तार अधिकारी अंभोरे, तालुका कृषी अधिकारी राठोड, अव्वल कारकून बालाजी कचरे व सर्व तलाठी यांची उपस्थिती होती.

शिबिरात वारस फेरफार व सातबारा २१ शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. इतर हक्कात नोंदी दुरुस्त केलेली सातबारा १३ शेतकऱ्यांना सातबारा वितरित केले . शेतरस्ते नोंदी केलेल्या तीन शेतरस्ता सातबारा शेतकऱ्यांना व्यतिरिक्त केले . ४० विद्यार्थ्यांना उत्पन्न, रहिवासी ,जातीचे प्रमाणपत्र ,

▶▶ उर्वरित पान २ वर







# जागतिक लोकसंख्या दिन : एक भस्मासुर की संधी ?

जागतिक लोकसंख्या दिन दरवर्षी ११ जुलै रोजी साजरा केला जातो . या लेखातून आपण लोकसंख्या वाढीच्या विविध पैलूंवर सखोल चर्चा करणार आहोत . ११ जुलै, १९८७ रोजी जगाची लोकसंख्या ५ अब्जांपर्यंत पोहोचली होती . अनेकदा लोकसंख्या वाढीला 'भस्मासुर' संबोधले जाते , कारण यामुळे अनेक समस्या निर्माण होतात . परंतु योग्य नियोजन आणि धोरणे आखल्यास ही लोकसंख्या एक मोठी शक्ती बनू शकते .

वाढती लोकसंख्या अनेक गंभीर समस्यांना निमंत्रण देते हे खरे आहेच , ज्यात प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत : पाणी , जंगल , खनिज पदार्थ यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिवापर होतो , त्यांचा ऱ्हास होतो , ज्यामुळे त्यांची उपलब्धता कमी होते . प्रदूषण, हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या समस्या वाढतात व पर्यावरणाचा समतोल बिघडतो. नोकरीच्या संधी कमी पडतात आणि मोठ्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य वाढते . वाढीव लोकसंख्येमुळे पायाभूत सुविधांवर ताण पडतो . शिक्षण , आरोग्य , वाहतूक , निवारा यांसारख्या मूलभूत सुविधांवर प्रचंड ताण येतो . अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो . वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेसे अन्न उत्पादन करणे आव्हान बनते . गुन्हेगारीत वाढ होते . संसाधनांच्या कमतरतेमुळे आणि सामाजिक असंतोषामुळे गुन्हेगारी वाढू शकते .

लोकसंख्येचे प्रकार आणि विभाजन : – लोकसंख्येचे अनेक प्रकारे विभाजन करता येते , ज्यामुळे सामाजिक , आर्थिक आणि नैसर्गिक अभ्यासात मदत होते . ज्यात जाती




आणि प्रजातीनुसार मानवी लोकसंख्या आणि इतर जीवसृष्टीतील विविध प्रजातींची संख्या यांचा अभ्यास केला जातो . बालके, तरुण, प्रौढ आणि वृद्ध असे वयोगटानुसार विभाजन करता येते . यामुळे देशाच्या विकासासाठी मनुष्यबळाची उपलब्धता समजते . त्याचप्रकारे विविध धर्मानुसार लोकसंख्येचे विभाजन असते . स्त्री आणि पुरुष लोकसंख्येचे प्रमाण मोजले जाते . शिवाय भौगोलिक विभागानुसार शहरी आणि ग्रामीण लोकसंख्या , तसेच विविध प्रदेशांनुसार लोकसंख्येचे वितरण असते .

भारत लोकसंख्या माहिती – सद्यस्थितीत संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार , २०२४ मध्ये भारताची लोकसंख्या अंदाजे १४४ कोटी (१.४४ अब्ज) इतकी आहे जी चीनच्या लोकसंख्येएवढी किंवा त्याहून जास्त आहे . २०३० पर्यंत भारताची लोकसंख्या १५० कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे . २०५० सालापर्यंत भारताची लोकसंख्या १६६ कोटींपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे . ०–१४ या वयोगटात २४ % , १५–६४ या वयोगटात ७९.८ % , ६५ + वयोगटात ८.१% इतकी लोकसंख्या आहे . लिंग गुणोत्तराचा विचार करता २०११ मध्ये प्रति १००० पुरुषांमागे ९४३ स्त्रिया होत्या . २०३६ पर्यंत हा आकडा ९५२ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे , जो लैंगिक समानतेच्या दृष्टीने सकारात्मक बदल दर्शवतो.

२०११ च्या जनगणनेनुसार , भारतातील शहरी लोकसंख्या सुमारे ३७७ दशलक्ष आहे , जी एकूण लोकसंख्येच्या ३१.१६% आहे . याचा अर्थ असा की भारतातील एक तृतीयांश लोकसंख्या शहरांमध्ये राहते . २०३६ पर्यंत भारताची शहरी लोकसंख्या वाढण्याची अपेक्षा आहे , कारण प्रजनन दर कमी होत आहे आणि लोकसंख्येचा एक मोठा भाग ६० वर्षांपेक्षा जास्त वयाचा असेल.आता आपण महाराष्ट्रातील लोकसंख्याविषयक माहिती बघू . २०२३ च्या जनगणनेच्या अंदाजानुसार , महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे १२.६४ कोटी (१२६.४ दशलक्ष) आहे . २०२५ साली महाराष्ट्राची लोकसंख्या अंदाजे १२.९५ कोटी (१२९.५६ दशलक्ष ) असेल . महाराष्ट्रात भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ८.८% ते ९.१% लोकसंख्या निवास करते . राज्यातील लोकसंख्या वाढीचा दर (२०२३) ०.८% आहे जो राष्ट्रीय सरासरीच्या जवळपास आहे तर लोकसंख्येची घनता (२०२१ च्या अंदाजानुसार ) ४०४ व्यक्ती प्रति चौरस किमी इतकी आहे . राज्याची जवळपास निम्मी (४८.५%) लोकसंख्या शहरी भागात राहते , जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे तर लिंग गुणोत्तर प्रति १००० पुरुष जन्मामागे ९१३ महिला जन्म इतके आहे . महाराष्ट्राचा साक्षरता दर (२०११ जनगणना ) ८२.३४ % इतका आहे . २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या अनुक्रमे ५४.७८ % (६,१५,५६,०७४ ) तर शहरी ४५.२२ % (५,०८,१८,२५९) इतकी आहे .

जरी लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम असले तरी , लोकसंख्येचे अनेक फायदे देखील आहेत . तरुण आणि कुशल लोकसंख्या देशासाठी मोठे मानव संसाधन असते , जे आर्थिक विकासाला गती देते . मोठी लोकसंख्या म्हणजे मोठी बाजारपेठ , ज्यामुळे उत्पादनांना मागणी वाढते आणि उद्योगांना प्रोत्साहन मिळते . नवीन कल्पना आणि नवोपक्रम . अधिक लोक म्हणजे अधिक बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता , ज्यामुळे नवीन कल्पना आणि नवोपक्रम समोर येतात . मोठ्या लोकसंख्येमुळे देशाच्या संरक्षणासाठी मोठी मनुष्यबळ उपलब्ध होते . परंतु यासाठी मानवी संसाधनाचा योग्य वापर झाला पाहिजे .

लोकसंख्या नियंत्रणासाठी शासन अनेक प्रयत्न करत असते . भारत सरकार लोकसंख्या नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबवत आहे – कुटुंब नियोजन कार्यक्रम ज्यात संतती नियमनासाठी विविध साधनांची उपलब्धता आणि जनजागृती यावर भर दिला जातो . शिक्षण आणि आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे . विशेषतः महिलांच्या शिक्षणावर भर दिल्याने कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटते . मुलींच्या लग्नाचे वय वाढवल्याने पहिल्या बाळंतपणाचे वय वाढते आणि एकूण प्रजनन दर कमी होतो . सरकारी योजना आणि प्रोत्साहन दिले जाते . लहान कुटुंबांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आहेत . लहान कुटुंबाचे फायदे आणि लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम याबद्दल जनजागृती करण्यात येते . लोकसंख्या नियंत्रणात समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका महत्त्वाची आहे . समाजाची, नवविवाहितांची, महाविद्यालयीन तरुण–तरुणींची आणि शालेय विद्यार्थ्यां यात महत्वाची भूमिका बजावू शकतात .

एकंदरीत काय तर आहे त्या लोकसंख्या जी क्रयशक्ती आहे तिचा वापर करायचा आणि हळूहळू लोकसंख्या नियंत्रित करायची हा सुवर्णमध्य साधता येणारे देश निश्चितपणे यशाच्या शिखराला गवसनी घालू शकतो .

लोकसंख्या वाढीचा , भार नको रे !
धरणीमातेवर , ताण नको रे !
एक–दोन बाळं , पुरे पुरे रे ! सुखी जीवनाचा , मंत्र हाच रे !
शिक्षित हो तू , जबाबदार हो तू , कुटुंब नियोजन , अंगीकार तू ,
स्वच्छ सुंदर जग , निर्माण करू, येऊ दे क्रांती , आता तरी !

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त , आपण सर्वांनी लोकसंख्या वाढीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एकत्र येण्याची प्रतिज्ञा करूया . जबाबदार नागरिक म्हणून , आपण शिक्षण , कुटुंब नियोजन आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांना प्राधान्य दिले पाहिजे . लोकसंख्या हा भस्मासुर नाही , तर योग्य नियोजनाने ती एक शक्ती बनू शकते , जी आपल्या देशाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाईल . चला , एक सुरक्षित आणि समृद्ध भविष्य घडवण्यासाठी प्रयत्न करूया !

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
**तहसीलदार, बीड**

पान १ वरून पुढे...

## मुख्याधिकाऱ्यांच्या घरात...

संभाजीनगर एसीबीचे पथक कसून तपास करत आहेत. माजलगाव नगर पालिकेत वेगवेगळे प्रकार चर्चेत असतांनाच आता नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्याविरूद्ध थेट छत्रपती संभाजीनगर येथून कारवाई झाली आहे. संभाजीनगर एसीबीकडे आलेल्या तक्रारीनुसार गुरूवारी सायंकाळी उशिरा छत्रपती संभाजीनगर एसीबीच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर येथे ही कारवाई केली. मुख्याधिकाऱ्यांना १२ लाखाची लाच घेताना पकडण्यात आले आहे. या कारवाईने सर्वत्र खळबळ माजली असून यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## विद्यादीप बालसुधारगृह...

बालसुधारगृहामधून पळालेल्या मुलींच्या चौकशीतून धक्कादायक माहिती समोर आली आहे. बालगृहातील मुलींचे कुठल्याही कारणाने पोट दुखले तरी प्रेग्नन्सी टेस्ट केली जात होती. मुली आजारी पडल्यावर त्यावर उपचार म्हणून एकाच प्रकारची गोळी दिली जात होती. त्यामुळे मुली अनेक दिवस एकाच आजाराने ग्रासलेल्या राहायच्या. त्यानेदेखील मुली बऱ्या झाल्या नाही तर पवित्र पाणी शिंपडून अथवा शरीरावर वेगळी चिन्हे काढून त्यांना आता तुम्ही बऱ्या व्हाल असा दावा केला जायचा. चित्रा वाघ यांचे अनेक खुलासे– सुधारगृहात मुली एकमेकींच्या जवळ आल्या तर त्यांना समलिंगी किंवा लेस्बियन म्हणून हिणवलं जायचं. काही मुली या पोक्सो केसमधील होत्या, त्यांना थेट वेश्या म्हणून सांगण्यात येत होते. मुलींच्या झोपण्याच्या रुममध्ये कॅमेरे लावण्यात आले होते अशी माहिती चित्रा वाघ यांनी दिली. ऐवढचं नाही तर कहर म्हणजे मुलींना कॅमेरासमोर कपडे बदलावे लागत होते. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ज्यावेळी मुलींना मासिक पाळी येत होती त्यावेळी त्यांना सॅनेटरी पॅड दिले जात होते. पण दुसरा पॅड हवा असल्यास पहिला दाखवल्या शिवाय दुसरा दिला जात नव्हता अशी माहिती देखीस चित्रा वाघ यांनी सभागृहाला दिला.

पान १ वरून पुढे...

## जुगार अड्ड्यावर...

पोशि/२११३ शरद भारती यांना घेवनु मिळालेल्या बातमीचे ठिकाणी २२.३० वा. छापा मारला असता सदर ठिकाणी इसम नामे सचिन वसंत जधव वय ४५ वर्षे रा. गांधीनगर पेठ बीड , मोहम्मद कुतुबुद्दीन शेख वय ५३ वर्ष रा.तेलगाव नाका बीड, जुनेदोद्दीन हामिदोद्दीन इनामदार वय २७ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड, शेख रहीम शेख तय्यब वय ३४ वर्षे रा. इस्लामपुरा पेठ बीड , सहीद खान रहीम खान पठाण वय ४० वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड , विक्रांत चंद्रकांत गायकवाड वय २६ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड , सय्यद इस्माईल सय्यद जाफर वय ५५ वर्ष रा. शंहन्शाह नगर पेठ बीड, शेख सलीम शेख हबीब वय ५५ वर्ष रा. शंहन्शाह नगर पेठ बीड ,ज्ञानेश्वर आश्रुबा गायकवाड वय ४९ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड हे मिळुण आले त्यांचे अगझडतील जगाराचे साहित्य पत्ते सह नगदी रक्कम ३३१५०/– रु., आठ मोबाईल कि.८८५००/– रु., दोन मोटार सायकल व एक स्कुटी कि. १३७०००/– रु. असा एकुण २५८६५०/– रु. मुद्देमला जप्त करण्यात आला. सदर छापा बाबत सरकार तर्फे फिर्यादी नामे महादेव निवृत्ती पवार वय ५६ वर्ष व्यवसाय नौकरी सफौ/१३६ नेमणुक पोलीस ठाणे पेठ बीड यांनी दिलेल्या फिर्याद वरुन एकुण ११ इसमान विरुध्द नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन या बाबत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, कमलेश मीना यांना माहीती देवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्यवाही केली असुन पुढील तपास पोह/१५०८ अनिल भालेराव हे करीत आहेत.

## अंबाजोगाई अवैधरीत्या...

पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिंदे पोलीस अंमलदार हनुमंत चादर भागवत नागरगोजे मनोज वाघ बाळासाहेब पारवे अमोल वाहूळे आदी कर्मचाऱ्यांकडून ही कारवाई करण्यात आली

पान १ वरून पुढे...

## रिल्ससाठीचा स्टंट...

धबधबा, येथील परिसर पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. मात्र, येथे येणाऱ्या काही तरुण पर्यटकांची स्टंटबाजी, युवकांची हुल्लडबाजी इथं मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ना पोलीस, ना प्रशासनाने तरुणाईच्या या हुल्लडबाजीवर अंकुश ठेवल्याचे पाहायला मिळते. त्यामुळेच, येथे अपघाताच्या घटनाही घडताना चित्र आहे. रिलसाठी स्टंट करण्याच्या नादात तब्बल ३०० फूट खोल दरीत पर्यटकांची गाडी कोसळून भीषण अपघाताची घटना घडली आहे. या अपघाच्या घटनेचा व्हिडिओ समोर आला असून सोशल मीडियावरही व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, हा युवक कारचा रेस वाढवून गाडी एकाच जागी फिरवत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे फिरता फिरता रिव्हर्स गेअरमध्ये गाडी दरीत कोसळल्याचंही दिसत आहे. सुदैवाने बचावला युवक– कराड येथील काही युवक सडावाघापूर येथील उलटा धबधबा पाहून चारचाकी गाडीने गुजरवाडीच्या टेबल पॉईंटवर आले होते. याठिकाणी गाडीतील काही युवक खाली उतरले, तर यावेळी साहिल जाधव या युवकाने मोबाईल रिलसाठी गाडीबरोबर स्टंटबाजी करण्याचा प्रयत्न केला. गाडीसोबत स्टंट करताना साहिलचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी थेट ३०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघाताचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने गुजरवाडी येथील स्टंटबाज अपघाताचे सत्य बाहेर आले. यावेळी म्हावशी येथील स्थानिक गुराखी मंगेश जाधव व किंगमेकर अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी अपघातात जखमी झालेल्या साहिल जाधवला बाहेर काढल्याने त्याचा जीव वाचला. यावेळी पाटण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर हेही घटनास्थळी उपस्थित होते.

## नागरिकांना सर्व....

नॉन क्रिमिलियर व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीत वीज पडून मयत झालेल्या जनावरांच्या मौजे दौनापूर व

पान १ वरून पुढे...

गुट्टेवाडी शेतमालकास शासकीय मदत देण्यात आली. मौजे बोरखेड येथील शेतकरी आत्महत्या कुटुंबास व मौजे सारडगाव येथील वीज पडुन जखमी झालेल्या व्यक्तीस शासकीय अनुदान मदत देण्यात आली . महिला व बाल विकास विभागाकडून चार लाभार्थ्यास बेबी किट वाटप करण्यात आले. तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त मौजे मालेवाडी कुटेवाडी वाघाळा येथील चार कुटुंबीयांना तूर बियाणे मिनी किट वाटप करण्यात आले . मोजणी खात्याकडून गावठाण हद्दीतील १० शेतकऱ्यांना सनद वाटप व नकाशे यांचे वितरण केले. एकूण ९९ शेतकरी व विद्यार्थी यांना विविध लाभाचे वितरण जिल्हाधिकारी जॉन्सन व अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार आघाव यांनी मानले. परळी व पिंपळगाव गाढे या मंडळातील अनेक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आठवीच्या वर्गाचे उदघाटन– जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून शाळेत नव्यानेच मान्यता मिळालेल्या आठव्या वर्गाचे उद्घाटनही झाले. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात विविध महिला बचत गटाचे, तसेच महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग , पंचायत समिती विभागाचे विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्याचबरोबर सामाजिक अर्थसहाय्य योजना व पुरवठा विभागाचे लाभार्थी, शेतकरी फार्मर आयडी व डीबीटी करिता विशेष पथकाचे कॅम्प उभारण्यात आले होते .

तालुका क्रीडा संकुल, औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट

टोकवाडी येथील समाधान शिबिरानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व महसूल अधिकारी यांच्यासह तालुका क्रीडा संकुल परळी येथील जागेची पाहणी केली. तसेच औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट दिली . यावेळी त्यांच्यासोबत मुख्य अभियंता सुनील इंगोले व मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे देखील उपस्थित होते . दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी यांनी सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांची तालुकास्तरीय आढावा बैठक घेतली.

पान ४ वरून पुढे...

## खोटी भरती...

आवश्यक कायदेशीर कारवाई करणार आहोत. यासाठी कोणाच्या तक्रारी असल्यास त्याची दखल घेऊन त्याविरुद्ध सुद्धा कारवाई करणार आहोत. सायबर क्राईम विभागामार्फत तपास व खोटी माहिती देणाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल. सोशल मीडिया, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थि, सार्वजनिक ठिकाणी या ठिकाणी देण्यात येणारी माहिती, पाम्प्लेट्स, याद्वारे नागरी जनतेसाठी जागरूकता मोहीम राबवण्यात येणार आहे. बनावट वेबसाइट्स व मोबाईल नंबर बंद करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय समन्वय साधून अशा प्रकारच्या वेबसाईट किंवा मोबाईल नंबर शोध घेऊन ते बंद करण्यात येतील. नागरिकांनी कोणतीही भरती किंवा जाहिरात मिळाल्यास तीची खातरजमा अधिकृत शासकीय संकेतस्थळावरून करावी. कुठलीही संशयास्पद माहिती आढळल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. असे आवाहन बीड शहर पोलीस करत आहे.

## विकासकामांचा...

वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गत राबविण्यात येणा–या विविध विकासकामांचा आढावा जिल्हा परिषदेच्या बैठक सभागृहात श्री. लोखंडे यांनी घेतला. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा जात पडताळणी विभागाच्या सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम, संबधित तालुक्यातील विस्तार अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. विविध योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. प्रलंबित कामांचा स्वयंस्पष्ट कारणांसह अहवाल सादर करावा, अशा सूचनाही श्री. लोखंडे यांनी अधिकाऱ्यांना बैठकीत केल्या. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सोळंके यांनी कार्यान्वित विविध योजनांचा सविस्तर तपशील यावेळी सादर केला.

## चिंचपूर-तांदळवाडी...

अतिक्रमणाच्या विरोधात स्थानिक रहिवाशांनी ९ जुलै रोजी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू करून रस्ता मोकळा करण्याची मागणी केली. असून मागील ४० वर्षांपासून या मार्गाचा शेतकरी व ग्रामस्थ वाहतूक व शेतीसाठी मुख्य रस्ता म्हणून वापर करत आहेत. मात्र, अलीकडील काही महिन्यांपासून काही शेतकऱ्यांनी रस्त्याच्या कडेला अतिक्रमण करून मार्ग अडवला आहे. यामुळे गावात ये–जा करणाऱ्यांना व शाळकरी मुलांना देखील मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. उपोषणादरम्यान नागरिकांनी प्रशासनाकडून रस्त्यावरून अतिक्रमण हटवण्याची ठाम मागणी केली. या वेळी तहसील कार्यालयाचे अधिकारी नजीर कुरेशी, महसूल व पोलिस प्रशासन उपस्थित होते. आंदोलनानंतर तहसीलदार कार्यालयाच्या वतीने संबंधित रस्ता प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा केला जाईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. यानंतर चिंचपूर ग्रामस्थांनी सुरू केलेले उपोषण थांबवले.

पान ४ वरून पुढे...

## विशाल सराफ...

तहसील व नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन विशाल सराफ यांना त्यांच्या मागण्या मान्य केल्या असून लेखी स्वरूपात मागण्या मान्य करण्याचे पत्र दिल्यानंतर विशाल सराफ यांच्याकडून उपोषण मागे घेण्यात आले आहे. यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर खुरेशी व मुख्याधिकारी महेश गायकवाड सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. धारूर शहराच्या पश्चिमेस ऐतिहासिक किल्ला आहे मागच्या काळात या किल्ल्याच्या पडझड झालेल्या बांधकामासाठी निधी आला होता या निधीतून काही प्रमाणात बांधकाम झालेले आहे त्यामुळे काही प्रमाणात या किल्ल्याची शोभा वाढलेली आहे यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी येण्याचा योग सुरू झाला असला तरी मागील एक ते दोन वर्षांमध्ये पुन्हा हा ऐतिहासिक किल्ला पुरातत्त्व विभागाकडुन दुर्लक्षित होताना दिसून येत आहे सध्या या किल्ल्यात संरक्षक नसल्याने या ठिकाणी काही गैरप्रकार घडत आहेत. त्यामुळे महादुर्ग किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे, या रस्त्यावर झालेले अतिक्रमण काढण्यात यावे, किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने पथदिवे बसविण्यात यावे तसेच या भागात चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करण्यात यावे या मागण्या घेऊन विशाल सराफ यांच्याकडून तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते या उपोषणास बालाजी चव्हाण, सुरेश शेळके, सुनील कावळे ,विश्वास शिनगारे आदींनी भेट देऊन उपोषण करते व प्रशासन यांच्यात मध्यस्थी करून विशाल सराफ यांच्या मागणीप्रमाणे मागण्या मान्य करण्यात प्रशासनाने सहमती दर्शवली आहे आणि तशा प्रकारचे लेखी पत्र उपोषणकर्ते विशाल सराफ यांना देण्यात आले आहे यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर कुरेशी मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी या उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण सोडवले यावेळी रोहित फावडे, सतीश गायकवाड हनुमान तोंडे,सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालमत्ता कर...

नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्रामध्ये अनेकवेळा मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम जास्त असणे, मालमत्ता धारकांची आर्थिक अडचण असणे व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० नुसार (१) (अ) बिलाच्या न भरलेल्या रक्कमेवर दरमहा २ टक्के दंड मालमत्ता धारकांच्या एकूण थकबाकीमध्ये लावण्याचे प्रावधान आहे. शास्ती % यावर उपाययोजना म्हणून नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता दरात वाढ होऊन याचे विपरित परिणाम कर वसुलीवर होतो. वरील शास्ती माफ करुन कर वसुली करण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू करण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात आलेला आहे. तसेच अभय योजना ही एकदाच लागू आहे. थकीत मालमत्ता कराच्या रक्कमेवरील फक्त शास्तीस (दंड) अभय योजना लागू आहे. अभययोजना थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी प्रोत्साहन पर आहे. जे मिळकत धारक

पान ४ वरून पुढे...

शास्ती (दंड) वगळता इतर थकीत मालमत्ताकर जसे की पाणीपट्टी, वृक्ष कर, अग्निशमन कर, शिक्षण कर, घनकचरा कर संपूर्ण रक्कम भरतील त्यांच्या बाबतीतच शास्तीच्या (दंड) सवलतीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. सदर योजनेचा लाभ देणे कामी नगर परिषदेकडे मिळकत धारकांनी प्रस्ताव / विहित नमुन्यात अर्ज देणे आवश्यक आहे. जे मिळकत धारक अभय योजनेचा लाभ घेऊ इच्छित असलेल्यांकडून विहित नमुन्यात प्रकरण ५० टक्के किंवा त्याहून जास्त सवलत मागणी करिता परिपूर्ण प्रस्ताव बीड नगर परिषदेकडे सादर करावा लागेल.

## महापुरुषांच्या जयंतीनिमित्त...

फाटतात, जीर्ण होतात आणि काही वेळा पायदळी तुडवलेही जातात. यामुळे त्या ध्वजांचे प्रतीकात्मक महत्त्व कमी होते, तसेच सामाजिक आणि कायदेशीर अडचणी निर्माण होतात. ध्वजांची विटंबना ही कायद्याचे उल्लंघन मानली जाते आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, ध्वज म्हणजे महापुरुषांच्या अस्मितेचे, त्यागाचे, बलिदानाचे प्रतीक आहे. त्यामुळे त्यांची अवहेलना होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. पोलिस प्रशासनाने दखल घ्यावी – ठोस मागणी. जयंती कार्यक्रमासाठी पोलिस परवानगी आवश्यक असतेच. त्यामुळेच पोलिस प्रशासनाने प्रत्येक सार्वजनिक उत्सव समितीला ध्वज व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करताना लेखी सूचना द्याव्यात, असेही डॉ. ढवळे यांनी सांगितले. तसेच जयंतीनंतर ठराविक कालावधीनंतर जीर्ण, फाटलेले, खालवर पडलेले वा दुर्लक्षित ध्वज तातडीने काढून घेण्याची जबाबदारी देखील निश्चित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

## अखिल भारतीय ...

ही निवड गुरुपौर्णिमेच्या दिवशी करण्यात आली आहे. उर्वरित जिल्हाकारणी आठवड्यात लवकरच बैठक येणार असल्याची माहिती आत्मलिंग शेटे यांनी सतरा वेळी बोलताना सांगितले आहे. या निवडीच्या सत्काराला संपादक मोहन वावळे, संतोष जुजगर,अनिल गायकवाड,राज जगतकर रावसाहेब आदी उपस्थित होते.

## शाळा बंद...

रोजी टप्पावाढीचा शासनादेश निर्गमित करण्यात आला. त्यावर मतांचे पीक काढून सत्ता मिळविण्यात आली. मात्र शासनादेशाची अंमलबजावणी नाही. विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना टप्पावाढ मिळावी म्हणून ५ जुन २०२५ पासून शिक्षक समन्वय संघाचे आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. सरकार त्याची दखल घेत नसल्याने शिक्षक समन्वय संघाने ८ व व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास सक्रीय पाठींबा दिला असून शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता टप्पावाढ

पान ४ वरून पुढे...

देण्यात यावी तद्वतच विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे व जुनी पेन्शन योजना लागू करावी, या असंतोषाची दखल घ्यावी, अप्रिय घटना टाळाव्यात, अशा विषयाचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघ अंबाजोगाई च्या वतीने उपविभागीय कार्यालयाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात प्रदीप चव्हाण, महेश रोकडे, अशोक बनसोडे, पट्टेवाड ए. जी. प्रशांत मस्के, तोंडारे एन.एस, थोरात, तेलंग एस.जे, चंदनशिव एस. बी, तारे एस., ढगे शिवहार आदी शिक्षक बांधवांची स्वाक्षरी आहे.

## शेतकऱ्यांसाठी घेतलेला...

पंकजाताई मुंडे व महसूल राज्यमंत्री यांनी महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये पाठवलेला आहे म्हणून या उत्कृष्ट निर्णयाचे महाराष्ट्र मधून सर्व शेतकरी बांधवांमधून तसेच विद्यार्थ्यांमधून विद्यार्थ्यांनी मधून कौतुक होत आहे याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांना व विद्यार्थी विद्यार्थिनींना यांना आवाहन केले आहे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवा भाऊ व महसूल मंत्री चंद्रकांत जी बावनकुळे साहेब तसेच बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन मंत्री सन्माननीय पंकजाताई मुंडे व महसूल राज्यमंत्री यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून सर्व शेतकऱ्यांच्या हिताचे व फायद्याचे भाजपचे सरकार निर्णय घेत आहे म्हणून बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधव यांनी व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी कुठे ही शासकीय कार्यालयामध्ये किंवा निमशासकीय कार्यालयामध्ये पाचशे रुपयाची शपथपत्र स्टॅम्प देऊ नये.

## नफरवाडीच्या जिल्हा...

रविकांत पांडव, सुभाष सवासे हे होते. या मधील बॅक टू स्कूल हा महत्वाचा आणि यशस्वी उपक्रम आहे.बॅक टू स्कूल उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या शाळेतील ११५ विद्यार्थ्यांना शालेय दप्तर डलहेश्र इरस आणि शालेयउपयोगी शैक्षणिक साहित्याची किट दिल्याबद्दल शाळेच्या वतीने,ग्रामस्थांच्या वतीने पारिजात संस्था मुबंई यांचे आभार तसेच ऋण व्यक्त केले. सदरील कार्यक्रमासाठी गावातील दत्तात्रय सवासे, संतोष वाघ,पांडुरंग तांबे,संभाजी चव्हाण,खंडू तळेकर, काशिनाथ सस्ते,काकासाहेब मंडलिक,लक्ष्मण कवडे,प्रदिप वाघ,कैलास तांबे,गणेश शिंदे,ज्ञानोबा तांबे ,किशोर तळेकर,भागवत दराडे आदी पुरुष पालक तसेच महिला पालक,शिक्षणप्रेमी नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुरूमकर सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री राऊत सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील श्रीम.काकडे मॅडम,वावरे मॅडम,ट्रेनी शिक्षक सुशील ढेरे तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विविध संस्था आणि शाळांमध्ये गुरूपोर्णिमा उत्साहात साजरी

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही

### श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशिवर्चन ; माजलगाव मठात गुरूपौर्णिमेला उसळली भक्तांची गर्दी

**माजलगाव । प्रतिनिधी**

कोणत्याही समाजाची प्रगती शैक्षणिक गुणवत्तेवर ठरत असते. जीवनात सर्वांगिण प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे समाजातील मुलामुलींनी शिक्षणाकडे आपले अधिक लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी आपल्या आशिवर्चनात केले, ते गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त कार्यक्रमात बोलत होते. दरम्यान, या उत्सवाला अक्षरशः भक्तांची गर्दी उसळली होती.

गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्यात समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थींनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. माजलगाव मठात गुरूपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. यावेळी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजलगाव मठाचा सर्वदूर लौकिक आहे. तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी जो आदर्श वसा आणि वारसा घालू दिला आहे. तो तत्परतेने पूर्ण करण्यास आपण बांधील आहोत, असे प्रतिपादन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले. गुरूंना भक्तांची निस्सीम भक्ती अपेक्षित असते. गुरूंची भक्ती मनोभावे करावी असे, आवाहन करत उपस्थित भक्तगणांना गुरूपौर्णिमेचे महत्व विषद केले. गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यात प्रामुख्याने इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली.

गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध धार्मिक विधी पार पडल्या. समाजबांधवांकडून सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधीस रूद्राभिषेक, लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीस अभिषेक, श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करण्यात आली. दरम्यान, या गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्याला महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातुनही भक्तगणांनी हजेरी लावली होती. दरम्यान, उल्लेखनीय कार्याबद्दल तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, बाबा देशमाने, आनंद डोंगरे, बालासाहेब फपाळ पाटील, भगीरथ तोडकरी यांचा सन्मान करण्यात आला.

**● मठाच्या 'तपोरत्नं'चे लोकार्पण**

**सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानच्या धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची नोंद घेण्यासाठी 'संस्काराचा समृद्धपाया तपोरत्नं' या त्रैमासिकाची निर्मीती केली. श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते आज 'तपोरत्नं'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी 'तपोरत्नं' त्रैमासिकाबाबत महाराजांनी विशेष माहिती दिली. प्रकाशनाला महानंदा मल्टीस्टेटचे अध्यक्ष ओंकार खुर्पे, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे सीईओ रविंद्र कानडे, राजभाऊ लोखंडे, बाबा देशमाने, भगीरथ तोडकरी, आनंद तोंडुळे, संजय मोगरकर, विकास पाटील, आकाश काटकर आदींसह मान्यवर उपस्थित होते.**



## भागुजीराव ढेकळे विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरूपोर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते. आदर्श शिक्षण संस्थेचे कृषि पंडित भागुजीराव ढेकळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आषाढ महिन्यातील पोर्णिमेचे औचित्य साधून आद्यगुरू महर्षी व्यास यांचा जन्मदिवस गुरूपोर्णिमा म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका तथा आपल्या सर्वांच्या गुरू स्व.काकूंच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य थिटे ए. एस. यांनी करून अभिवादन केले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व गुरूजनांचा सन्मान केला. प्राचार्य थिटे ए. एस. यांनी गुरूचे महत्व स्पष्ट करत असताना गुरूविना जीवन अपूर्ण आहे हे विद्यार्थ्यांना पटवून देवून गुरूपोर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, प्रा.अरूण कळासे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




*डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात आज गुरूपौर्णिमा निमित्त कार्यक्रम घेण्यात आला.सूत्रसंचलन कु.आदिती उबाळे व कु. आर्या सुखवसे यांनी केले. तर कु.सोनाली जगताप व रुतुजा दिवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. रोहिदास डोंगरदिवे यांनी अध्यक्षीय समारोप करताना गुरु व शिष्याचे नाते किती महत्त्वाचे असते. नम्रता व विनयशीलतेचे शिक्षणातील महत्व विशद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.*

## शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**



शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयात दि.१०/०७/२०२५ रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती,स्व. काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी.कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे ह.भ.प.बळीराम महाराज कुटे,श्री. दशरथ काकडे व विद्यालयातील सर्व शिक्षक कर्मचार्यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गिताने करण्यात आली.विद्यालयाच्यावतीने प्रमुख पाहूणे ह.भ.प.बळीराम महाराज कुटे व श्री.दशरथ काकडे यांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.गुरुपौर्णिमा निमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. विद्यालयातील कु.प्रभाळे रसिका,कु.सुपेकर दिव्या,कु.डोळस सलोनी,कु. वाघमारे नंदिनी,चि.ससाणे विहान,चि.घोडके सचिन,चि. काळे आदिराज,चि.शिंदे विराट यांनी गुरुपौर्णिमा निमित्त आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे ह.भ.प. बळीराम महाराज कुटे यांनी गुरु-शिष्य परंपरा व गुरुचं जीवनातील स्थान याविषयी विविध उदाहरणांसह विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.हौसमाने माहेश्वरी व कु. थोरात गौरी यांनी केले.तर आभार विद्यालयातील जेष्ठ शिक्षक श्री.चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे गुरूपौर्णिमा उत्साहात संपन्न

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गुरूपौर्णिमा उत्सव आज (दि. १०, गुरुवार) मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला, तसेच श्रीगुरू ईश्वरबाबा महाराजांच्या समाधीची महापूजा करण्यात आली.

कार्यक्रमात वारकरी मंडळींनी भजनसेवा सादर केली. त्यानंतर महाप्रसादाच्या पंगती पार पडल्या, ज्यात हजारो भाविकांनी सहभाग घेतला. पंचक्रोशीतील भाविकांनी समाधी दर्शन आणि महंतांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

**● गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरूपौर्णिमा – शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज**

**गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाणारी ही गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्याची अनोखी परंपरा आहे. महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीस चार वेदांचे ज्ञान दिले. त्यांचा जन्म आषाढ पौर्णिमेला झाला होता, म्हणूनच हा दिवस गुरूपौर्णिमा म्हणून ओळखला जातो. हा दिवस केवळ अध्यात्मिकच नव्हे तर शैक्षणिक, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील गुरूंप्रती आदर व्यक्त करण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे, असे शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले.**



*बीड : गुरु पौर्णिमेनिमित्त दिनांक १० जुलै २०२५ रोजी कल्याण नगर परिसरात डॉ. संजय तांदळे व गणेश सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानसागर गुरुकुल च्या विद्यार्थ्यांनी ५० वृक्षांची लागवड करून गुरुपौर्णिमा साजरी केली.*

## विनायक प्राथमिक शाळेत गुरुपौर्णिमा साजरी



**बीड । प्रतिनिधी**

विनायक प्राथमिक शाळा पेठ बीड येथे गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर,प्रमुख पाहुणे उत्तरेश्वर भारती सर यांनी शिक्षणाची देवता सरस्वती,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,शाळेच्या प्रेरणास्थान गुरुतुल्य,वंदनीय स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुरुपौर्णिमेचे महत्व व उद्देश, संकल्पना, भूमिका शाळेचे श्री.तन्वीर पठाण सरांनी आपल्या प्रास्ताविकातून विषद केले.गुरू,शिक्षक हे जीवनाचे शिल्पकार असतात त्यांचा आदर, सन्मान विनम्रता ठेवणे शिष्यांचे,विद्यार्थ्यांचे कर्तव्य असते. सर्व गुरुवर्यांना गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा,गुरूंनी शिकवलेल्या संस्काराची, ज्ञानाची आपण जपणूक करून ती पुढे चालवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे हे गरजेचे आहे ,अशा महत्वपूर्ण भावना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. किर्तीताई पांगारकर यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केल्या.या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन श्री.विवेक गव्हाणे सरांनी केले तर आभार काळे सरांनी मानले.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य विकास कौशल्य सप्ताह अंतर्गत अतिथी व्याख्यान संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या जागतिक कौशल्य विकास सप्ताहाअंतर्गत राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये डॉ. विजयकुमार कुंभारे यांचे कौशल्य विकास एक करिअर घडविण्याचे साधन या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना या विषया वरील मांडणीतून सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले. कौशल्य विकास आजच्या काळात अपरिहार्य असल्याचे नमूद करून सर्व विद्यार्थी यांनी कौशल्य विकसित करून स्वयंपूर्ण बनावे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी या विषयावरील व्याख्यानातून विद्यार्थ्यांना कौशल्यांची गरज व आवश्यकता समजण्यास मदत झाली. सहभागी विद्यार्थ्यांनी आवडीनुसार कौशल्य विकसित करावी असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनंथा गाडे यांनी तर आभार प्रा. निलेश शिंदे यांनी मानले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सचिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर यांबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनो शैक्षणिक साहित्य हेच तुमचे शस्त्र, यानेच क्रांती घडवा-खुर्शीदआलम



**बीड । प्रतिनिधी**

जि.प.केंद्रीय प्रा.अशोकनगर शाळेत गुरुआनंद प्रतिष्ठान आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबईच्या वतीने सीमा ओस्तवाल यांच्या माध्यमातून शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मोफत वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष दै.लोकाशा चे संपादक विजय बंब तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळुक, स्वप्निल भैय्या गलधर, मा.सभापती खुर्शीद आलम, संपादक शेख ताहेर,शेख उस्मान,माटे साहेब,पत्रकार अदनान खान, पठाण जफर खान, ड. खाजा इत्यादी प्रमुखांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी विजय राज बंब आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की सीमा ओस्तावाल या २४ तास सामाजिक कार्य करत असतात, तेवढे सामाजिक कार्य माझ्या कडून ही घडत नही. खुर्शीद आलम म्हणाले की शैक्षणिक साहित्य हेच आजच्या युगातील विद्यार्थ्यांचे हत्यार असून यानेच विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्रांती करावी.

विस्तार अधिकारी सिद्देश्वर माटे यांनी सीमा ओस्तावाल यांच्या सामाजिक कार्यास तोड नाही. तर मुख्याध्यापक लांडगे मॅडम यांनी मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा शिक्षणासाठी वापर करतील. तर शिवसेना जिल्हा प्रमुख यांनी मत व्यक्त करताना सांगितले की सीमा ओस्तवालआणि त्यांचे प्रयास फौंडेशन विदयार्थ्यांच्या जीवनात वेगळा आनंद शैक्षणिक साहित्य देऊन निर्माण करतात. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शोभा कदम यांनी केले तर आभार व प्रास्ताविक केंद्र प्रमुख मनियार हकीम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले,

दैनिक **मराठवाडा पत्र**
● https://marathwadapatra.com
शुक्रवार, दि.११ जुलै २०२५


## खोटी भरती जाहिरातींविषयी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

**बीड ।** प्रतिनिधी


बीड जिल्ह्यात पशु आरोग्य सेवक या पदासाठी शासनामार्फत भरती होत असल्याची खोटी माहिती सोशल मीडियावर व विविध माध्यमांतून प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात पशुसंवर्धन विभागामार्फत अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे की सद्यस्थितीत अशा कोणत्याही भरतीसाठी प्रक्रिया सुरू नाही. ही माहिती फसवणूक करणाऱ्यांनी हेतुपुरस्सर पसरवली असून त्याद्वारे आर्थिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा बनावट भरतीच्या जाहिरातींना बळी न पडता नागरिकांनी अधिकृत शासकीय संकेतस्थळांवरूनच खात्री करावी. बीड शहर पोलीस विभागामार्फत यासंदर्भात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत: सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या बनावट जाहिरातींवर लक्ष ठेवून ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रशासक एस.डी.एम. कविता जाधव, सी.ओ. नीता अंधारे यांच्या कारभारावर तीव्र नाराज !

### बीड शहर बचाव मंचच्या शिष्टमंडळाने घेतली प्रशासकांची भेट

**बीड ।** प्रतिनिधी



बीड शहर बचाव मंचाच्या समितीने नगर परिषदेच्या प्रशासक एस.डी एम.कविता जाधव यांची, बीड शहरात स्ट्रीट लॅम्प अभावी अनेक भागांमध्ये महिला भगिनी मुले,मुली व खास करून ज्येष्ठ नागरिकांना दररोज अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यातच मोकाट जनावरे व कुत्र्यांचा त्रास बऱ्याच काळापासून मोठ्या प्रमाणावर बीडची जनता सहन करत आहे, मोकाट जनावरं व कुत्र्यानंमुळे अपघाताचे शहरांमध्ये प्रमाण प्रचंड वाढले आहे, यामुळे अनेक अनेक नागरिकांना अपंगत्व आलेले आहे. नागरिकांच्या जीवाला दररोज धोका निर्माण होत आहे. या सर्व जनतेच्या समस्यांविषयी भेट घेतली. बीड करांच्या या अडचणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी एस.डी.एम. प्रशासक कविता जाधव यांनी बीड न.प.मुख्याधिकारी नीता अंधारे व नगरपरिषदेच्या गलथान कारभारावर खूपच तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्याधिकारी नीता अंधारे व नगरपालिकेच्या सर्व गलथान कारभारावर त्या लवकरच जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेऊन चर्चा करणार आहे व शासनाला वरिष्ठ पातळीवर सर्व प्रकाराची माहिती देणार आहे असे त्यांनी ठाम पणे सांगितले. यावर बीड शहर बचाव मंचाच्या समितीने, बीड शहरातील जनता अनेक समस्यांना तोंड देत आहे. मूलभूत सोयीसुविधांचा फार मोठ्या प्रम णावर आभाव बीड शहरांमध्ये आहे तरी माननीय प्रशासक यांनी बीड शहरातील जनतेच्या सर्व समस्यांवर आपण सखोल लक्ष घालावे अशी विनंती केली आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने निमंत्रक व अध्यक्ष नितीन जायभाये यांनी बाजू मांडली यावेळी चर्चेत यावेळी झालेल्या चर्चेत प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे, प्रमुख सल्लागार ॲड. नितीन वाघमारे, ॲड.अनिल बारगजे, शहराचे उपाध्यक्ष परवेज कुरेशी, ॲड. विलास ढाकणे, बाजीराव ढाकणे, संजय कुलकर्णी, डॉ.संजय तांदळे, सुधीर भाऊ देशमुख, ॲड. सुनील आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विकासकामांचा गावनिहाय अहवाल तत्काळ सादर करा: गोरक्ष लोखंडे

**बीड ।** प्रतिनिधी

दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गतचे उद्दिष्ट, प्राप्त व खर्च झालेला निधी, पूर्ण झालेली कामे, प्रगती पथावर असलेल्या कामांचा गावनिहाय परिपूर्ण अहवाल राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगास तत्काळ सादर करावा, अशा सूचना राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी सबंधित अधिकाऱ्यांना केल्या. दलित ▶▶ उर्वरित पान २ वर

## चिंचपूर-तांदळवाडी रस्ता अडवला नागरिकांचे तहसील कार्यालयासमोर उपोषण

**किल्ले धारूर ।** प्रतिनिधी




धारूर तालुक्यातील शंकरराव पाटील नगर (इनाम वस्ती) येथील रहिवाशांनी चिंचपूर शिव रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे होणाऱ्या त्रासाविर-ोधात आवाज उठवला आहे. मागील ४० वर्षांपासून या परिसरातील शेतकरी व नागरिक या रस्त्याचा वापर करीत असून सध्या काही शेतकऱ्यांनी रस्त्याच्या कडेला अतिक्रमण केल्यामुळे मार्ग अडवला आहे. त्यामुळे ये-जा करणाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे गावातील नागरिकांनी अनेक वेळा मागणी करून ही रस्ता मोकळा केला जात नसल्याने तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. धारूर तालुक्यातील चिंचपूर तांदळवाडी रस्त्यावरील शंकरराव पाटील नगर (इनामवस्ती) येथील चिंचपूर शिव रस्त्यावर झालेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर



*मध्य प्रदेश राज्यातील सिहोर येथील कुबेरेश्वर धाम या ठिकाणी गुरुपौर्णिमेनिमित्त भागवत भूषण पंडित प्रदीप जी मिश्रा यांचे शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे,प्रसिद्ध उद्योगपती हनुमानसेट बियाणी,व्यापारी महासंघाचे सदस्य केदारसेट जाजु,सुदर्शन पाटील यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.*

## विशाल सराफ यांच्या मागणीला यश, लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

### किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर बसणार कॅमेरे परिसरात पथदिवे व स्वच्छता होणार



**किल्ले धारूर ।** प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरात ऐतिहासिक किल्ला आहे पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याची दैना झाली आहे यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे त्याम ुळे ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी विविध मागण्या घेऊन विशाल सराफ यांनी दि.१० जुलै रोजी धारू तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते या उपोषणाची ▶▶ उर्वरित पान २ वर

## मालमत्ता कर थकीत असलेल्या बीड शहरातील नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा : नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुक पटेल

**बीड ।** प्रतिनिधी

बीड नगरपालिकेत मालमत्ता कराच्या व्याजावर ५० टक्के सुट देण्याची सवलत अभय योजने अंतर्गत बीड नगरपालिकेने दिली असून यामुळे नागरिकांचा आर्थिक बोजा कमी होणार असून गरजू नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुक पटेल यांनी केले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील नगरपालिका/ ▶▶ उर्वरित पान २ वर

**● काय आहे अभय योजना ?**

**दि. ०३/०७/२०२५ पासून ते दि. ०८/०८/२०२५ कालावधीत चालू राहणार्या या अभय योजनेनुसार थकबाकीदारांनी ३१ जानेवारीपर्यंत मालमत्ता कराची थकबाकी भरल्यास त्यांना व्याजाच्या रक्कमेत ५० टक्के सूट मिळणार आहे. तसेच दिनांक १९/०५/२०२५ नंतरच्या थकबाकी शास्तीस (दंड) अभय योजना लागू राहणार नाही.**

## महापुरुषांच्या जयंतीनिमित्त उभारण्यात आलेल्या ध्वजांची काळजी घ्या!

### ध्वजांची अवहेलना टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने लक्ष द्यावे

**बीड ।** प्रतिनिधी



महापुरुषांच्या जयंतीनिमित्त शहर व ग्रामीण भागात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. या उपक्रमांची सजावट म्हणून सार्वजनिक ठिकाणी चौकाचौकात, रस्त्यांवर, लोखंडी दुभाजकांवर व पथदिव्यांच्या खांबांवर विविध ध्वज लावले जातात. मात्र, या ध्वजांची योग्य देखभाल न झाल्याने ते ▶▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाच्या जिल्हा सरचिटणीस पदी बालाजी जगतकर च्या निवडीबद्दल सत्कार



**परळी ।** प्रतिनिधी

परळी प्रतिनिधी - अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाचे मराठवाडा अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील कार्यकारणीत बालाजी जगतकर यांची सरचिटणीसपदी निवड केली आहे. देशपातळीवर व राज्यपातळीवर प्रकारासाठी ही संघटना काम करते. बीड जिल्ह्यात बालाजी जगतकर हे अनेक वर्षापासून पत्रकार व संपादक म्हणून काम करत आहेत. जिल्ह्यात संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ▶▶ उर्वरित पान २ वर

## शाळा बंद आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठींबा

### उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे निवेदन देऊन पाठिंबा दिला

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी



विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, टप्पावाढीसाठी ८ व ९ जुलै २०२५ रोजी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठींबा दिला आहे. आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पाठिंबा असलेले निवेदन उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे दाखल केले आहे. कायम शब्द काढलेल्या सुमारे पाच हजार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, वर्ग आणि तुकड्यांवर कार्यरत हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन वा अंशतः वेतनावर काम करीत आहेत. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रातील शिक्षकांची ही कुचेष्टाच आहे. शासनाने विधिमंडळात दिलेल्या शब्दानुसार सर्व शाळा, वर्ग आणि तुकड्यांना २०१८ साली शंभर टक्के अनुदान मिळणे अपेक्षित होते. परंतु, २०२५ अर्ध्या पेक्षा अधिक सरले तरी या शाळा वर्ग आणि तुकड्या विनाअनुद्धानित वा अंशतः अनुदानित आहेत. प्रत्येक टप्पावाढ मिळविण्यासाठी तीन तीन, चार चार वर्षे आदोलने करावी लागतात, ही महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षणाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. १४ ऑक्टोबर २०२४ ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांसाठी घेतलेला पाचशे रुपयाचा स्टॅम्प रद्द याचा लाभ जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा : नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड ।** प्रतिनिधी



महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस उर्फ देवा भाऊ यांनी व महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील शेतकरी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांना ५०० रुपयांचा स्टॅम्प आता इथून पुढे शासकीय कार्यालयामध्ये शपथपत्र म्हणून द्यावा लागणार नाही असा शेतकरी हिताचा व विद्यार्थी हिताचा असा महत्त्वपूर्ण निर्णय पाचशे रुपयाचा शपथपत्र स्टॅम्प रद्द करून हा सरकारने निर्णय घेतला आहे आणि कोणालाही इथून पुढे शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये पाचशे रुपयाचा स्टॅम्प देण्याची आवश्यकता नसल्याचाही आता शासन निर्णयामध्ये सांगितले आहे आणि तसा जीआर देखील मा श्री मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व कॅबिनेट महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे साहेब बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन मंत्री ▶▶ उर्वरित पान २ वर

# नफरवाडीच्या जिल्हा परिषद शाळेची मुंबईच्या पारिजात संस्थेकडून दखल

### ● संस्थेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**पाटोदा ।** प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील आय एस ओ मानांकित जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कार्याची दखल घेत मुंबई येथील पारिजात संस्थेच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री उत्तरेश्वर औटे तर प्रमुख पाहुणे पाटोदा तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री धनंजय बोंदार्डे साहेब तसेच गावचे सरपंच बंडू सवासे, शिक्षणप्रेमी नागरिक सावंत सर, उपसरपंच केशव तांबे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अशोक वाघ,सदस्य बाळू ढोले, रविकांत वनवे, लहू दराडे, दगडू मंडलिक, अशोक मंडलिक, श्रीकांत बुधवंत, ▶▶ उर्वरित पान २ वर




**● हजार हृदये गहिवरली तर, मन माझे गहिवरते, असे हजारो संगे आहे, जडलेले माझे नाते.. या काव्यपंक्ती वाचायला किती सुंदर वाटतात ना आणि याचा जीवनात अवलंब करणारी माणसे जगात आहेत याचा प्रत्यय आला आमच्या जि.प.प्रा.शा.नफरवाडी शाळेला आला तो पारिजात या संस्थेच्या मदतीतून...!!! स्वतःसाठी लाखो रुपये खर्च करणारी माणसे जशी या जगात आहेत तसेच स्वतःच्या गरजा मर्यादित ठेवून,इतरांचे मदतीचे हात एकत्र करून गरजू विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंद फुलवण्याचे काम पारिजात संस्था करते. पारिजातकाचे फुल जसं स्वतःच्या अल्पशा आयुष्याने सृष्टी सुगंधित करते तसेच काम ही संस्था करत आहे. हे मदतीचे हात अनेकांच्या गरजा पूर्ण करून त्यांचे जीवन तिमिरातून तेजाकडे नेण्याचे काम करत आहेत. पारिजात संस्थेने त्यांच्या सुगंध जगण्यातला या घोषवाक्यप्रमाणे आमच्या शाळेतील ११५ विद्यार्थ्यांच्या जीवनात खरोखरच सुगंध देण्याचे अमूल्य कार्य केले आहे. – मुख्याध्यापक, अण्णासाहेब महादेव खंडागळे, जि.प.प्रा.शा.नफरवाडी, ता.पाटोदा जि.बीड**

